REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 3 | DECEMBER - 2025

# "गंगाखेड आणि सोनपेठ तालुक्यातील साक्षरतेचा तुलनात्मक अभ्यास"

बालाजी गोविंद चव्हाण
संशोधक, भूशास्त्र संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विध्यावीठ, नांदेड.

प्रा. डॉ. दयानंद गो. उजळंबे
मार्गदर्शक, कला, वाणिज्य व विज्ञान महाविध्यालय , गंगाखेड.

➢ **सारांश :-**

एखादा प्रदेश व त्याचा विकास हे तेथील वास्तव्य करणाऱ्या लोकसंख्येच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. एखाद्या भौगोलिक प्रदेशाची साक्षरता ही त्या प्रदेशाचा विकास ठरवते. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड व सोनपेठ तालुक्यातील साक्षरता अभ्यासणे हा या शोध निबंधाचा हेतू आहे. या अभ्यासासाठी दोन्ही तालुक्यातील प्रतिनिधित्वक स्वरूपात २०-२० गावांची अभ्यासासाठी निवड केली आहे. या गावातील साक्षरता व साक्षरता दर याचा विश्लेषण करण्यात आला आहे. परभणी जिल्ह्याची साक्षरता राज्यातील सरासरी साक्षरता दरापेक्षा कमी असल्याचे दिसून येते. याचे कारणे शोधून त्यावर अभ्यासपूर्ण उपायोजना या संशोधनात सुचवण्यात आले आहे.




➢ **प्रस्तावना :-**

एखाद्या राष्ट्राच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक विकास होण्यासाठी शिक्षण हे मूलभूत साधन आहे. यावरून असे लक्षात येते कि, साक्षर जनतेमुळे समाजाची प्रगती होण्यास मदत होते. म्हणूनच शिक्षणाची **व्याख्या "साक्षरता म्हणजे सात वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक वयाची कोणताही व्यक्ती एखादी भाषा वाचू शकत असेल, समजू शकत असेल व लिहू शकत असेल; अशा व्यक्तीला साक्षर असे म्हणावे"** अशी केली आहे. साक्षरतेच्या अंगीकारणामुळे समाजात वाचन, लेखनाबरोबर विविध तांत्रिक कौशल्य प्राप्त होतात. या कौशल्याच्या बळावर समाज विविध प्रकारचे समाज व मानव हितार्थ कार्य करत असतो व स्वतः व समाजाच्या आरोग्य, शिक्षण व आर्थिक प्रगतीसाठी प्रयत्नशील असतो. एकंदरीतच शिक्षण हे मानवी समाजाच्या प्रगतीचा कणा असला, तरी बहुतेक भागात आजही सामाजिक, राजकीय व भौतिक अडथळयामुळे शिक्षण हे सर्वव्यापी झालेले नाही. हेच कारण आहे की

भारतासारख्या विकसनशील देशात साक्षरतेचे प्रमाण अजूनही ८०% (२०२३-२४ च्या आकडेवारी नुसार) च्या पुढे गेलेले दिसून येत नाही.

महाराष्ट्राच्या मराठवाडा विभागातील परभणी जिल्हा हा नऊ तालुक्यांनी बनला असून जिल्ह्यात भौगोलिक, सामाजिक भिन्नता पाहावयास मिळते. त्यामुळे जिल्ह्यात सर्वत्र शिक्षणाच्या सोयी सुविधा उपलब्ध असूनही जिल्ह्याची साक्षरता दर हवे तेवढे वाढलेले दिसून येत नाही. २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याच्या साक्षरता दर हा ७३.३४% आहे. हा दर राज्याच्या ८२.३४% व देशाच्या ७४.०४ % पेक्षा ९ टक्क्यांनी कमी आहे. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड आणि सोनपेठ तालुक्यातील साक्षरतेचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात केला आहे.


## ➢ उद्दिष्ट्ये:-

१) गंगाखेड व सोनपेठ तालुक्यातील साक्षरतेचा अभ्यास करणे.

२) गंगाखेड आणि सोनपेठ तालुक्यातील साक्षरतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

## ➢ अभ्यास क्षेत्र:-

स्थान व विस्तार नकाशा सोनपेठ व गंगाखेड तालुका




नकाशा क्र. १

सदरील संशोधनासाठी महाराष्ट्राच्या मराठवाडा विभागात असणाऱ्या परभणी जिल्ह्यातील गंगाखेड आणि सोनपेठ हे दोन तालुके घेतलेले आहेत. परभणी जिल्हा १८° ४५" उत्तर ते २०° १०" उत्तर अक्षवृत्ता दरम्यान तर ७६° १३" पूर्व ते ७७° ३९" पूर्व रेखावृत्ता दरम्यान विस्तारलेला आहे. जिल्ह्यातील गंगाखेड व सोनपेठ ही दोन तालुके एकमेकांना लागून आहेत. गंगाखेड तालुक्याचे भौगोलिक स्थान हे १८° ४५' ५०" उत्तर ते १९° ०४' २४" उत्तर अक्षवृत्त तर ७६° ३६' ४१" पूर्व ते ७६° ५२' ५३" पूर्व रेखावृत्ता दरम्यान आहे. तर सोनपेठ तालुका हा १८° ५१' ५०" उत्तर ते १९° ०६' ३७" उत्तर अक्षवृत्त व ७६° २७' १८" पूर्व ते ७६°४०' ३४" पूर्व रेखावृत्ता दरम्यान आहे. गंगाखेड व सोनपेठ तालुक्याची समुद्र सपाटी पासूनची उंची ४७५ ते ४५७ मीटर आहे.

## ➢ माहिती स्त्रोत व संशोधन पद्धती :-

## ➢ माहितीस्त्रोत:-

प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीय स्वरूपाची आकडेवारी वापरली आहे. त्यासाठी खालील स्त्रोतांचा वापर केला आहे.

१) भारतीय जनगणना पुस्तिका २०११. यातून गाव निहाय लोकसंख्या, साक्षरता दर यांची माहिती मिळवली आहे

२) महसूल विभाग गंगाखेड व सोनपेठ या विभागातून दोन्ही तालुक्यातील महसूल मंडळाविषयी माहिती मिळवले आहे.

३) सामाजिक व आर्थिक समालोचन, परभणी.

४) विविध संशोधनात्मक अहवाल, विविध राजकीय व शासकीय व निम-शासकीय अहवाल, विविध संशोधन पेपर यांचा वापर विविध प्रकारची माहिती मिळवण्यासाठी केला गेला आहे.

## ➢ अभ्यास पद्धती:-

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी संशोधनाच्या संख्यात्मक व तुलनात्मक पद्धतीचा अवलंब केला आहे. संशोधनासाठी तालुक्यातील प्रत्येकी २०-२० गावांची निवड केली आहे. ही गावे संपूर्ण तालुक्याचे प्रतिनिधित्व दर्शवतात. ही गावे निवडत असताना तालुक्यातील भौगोलिक स्थिती, संस्कृती घटक व मानवनिर्मित घटक यांचा विचार करून; नमुना निवडीच्या यादृच्छिक पद्धतीचा वापर केला गेला आहे.

तालुक्यातील साक्षरतेचा अभ्यास करताना भारतीय जनगणना २०११ च्या आकडेवारी नुसार तालुक्यातील साक्षरतेचे प्रमाण व त्याचे स्वरूप अभ्यासण्यासाठी ,त्यात होणारा बदल अभ्यासणे महत्वाचे होते. त्याकरिता सन २००१ च्या जनगणनेनुसार असणारी तालुक्याची साक्षरता अभ्यासणे गरजेचे आहे. यावरून तालुक्याच्या साक्षरता दरात किती प्रमाणात वाढ किवां घट झाली आहे, हे लक्षात येते. त्याकरिता २००१ व २०११ च्या जनगणने नुसार साक्षरता दाराची तुलना करून त्यातील फरक तपासून पहिले आहे. साक्षरता दर काढण्यासाठी खालील सूत्राचा वापर केला आहे.

$$\textbf{सूत्र: साक्षरता दर} = \frac{\text{एकूण साक्षर लोकसंख्या}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times १००$$

## ➢ साक्षरतेचा तालुकानिहाय अभ्यास :-

गंगाखेड तालुका व सोनपेठ तालुक्यातील साक्षरतेचा तालुकानिहाय अभ्यास करत असताना दोन्ही तालुक्यातील लोकसंख्या व त्यातील एकूण साक्षर लोकसंख्या यांच्यातील भिन्नता अभ्यासणे गरजेचे आहे. गंगाखेड तालुक्याची एकूण लोकसंख्या २०२८६५ आहे. त्या पैकी १५२९७४ लोकसंख्या ग्रामीण भागात राहते व ४९८९१ लोकसंख्या शहरी भागात राहते. तर सोनपेठ तालुक्यातील एकूण ८९५८२ लोकसंख्ये पैकी ७३८१७ लोकसंख्या ग्रामीण भागात राहते व १५७६५ एवढी लोकसंख्या शहरी भागात राहते. दोन्ही तालुक्याचा साक्षरता दर व त्यातील बदल अभ्यासण्यासाठी तालुक्यातील साक्षरतेत २००१ ते २०११ या कालावधीत झालेला बदल पुढील प्रमाणे अभ्यासला आहे.

| गंगाखेड तालुका साक्षरता दरातील वाढ (२००१ – ११) | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | गावाचे नाव | एकूण साक्षरता दर २००१ | एकूण साक्षरता दर २०११ | साक्षरता दरातील वाढ / फरक |
| १. | बन पिंपळा | ५१.०० | ७०.५६ | +१९.५६ |
| २. | बोर्डा | ५१.७५ | ७०.५३ | +१८.७८ |
| ३. | दामपुरी | ४३.४९ | ७०.९३ | +२७.४४ |
| ४. | गौंडगाव | ५४.३८ | ७२.९४ | +१८.५६ |
| ५. | घटांग्रा | ३४.०८ | ३९.७९ | +५.७१ |
| ६. | गूंजेगाव | ५२.६४ | ६५.३३ | +१२.६९ |
| ७. | इरळद | ४८.०० | ७०.०१ | +२२.१ |
| ८. | इसाद | ५२.१२ | ७१.०१ | +१८.९८ |
| ९. | महातपुरी | ५०.३९ | ६९.३९ | +१९ |
| १०. | मरडसगाव | ५३.१५ | ७२.१८ | +१९.०३ |
| ११. | मसला | ५६.५८ | ६९.२६ | +१२.६८ |
| १२. | मुळी | ६२.४९ | ७१.२३ | +८.७४ |
| १३. | पोखर्णी वाळक्या | ४७.०५ | ६६.३२ | +१९.२७ |
| १४. | राणीसावरगाव | ५७.०१ | ७४.७६ | +१७.६६ |
| १५. | रुमणा | ५४.०६ | ७४.३४ | +२०.२८ |
| १६. | शेलमोहा | ५४.४८ | ७८.८७ | +२४.३९ |
| १७. | सिरसम शेगाव | ५७.३७ | ६९.९८ | +१२.६१ |
| १८. | उखळी खु | ५१.१५ | ६५.६२ | +१४.४७ |
| १९. | वाघलगाव | ५३.२१ | ७४.९१ | +२१.७ |
| २०. | झोला | ५२.१७ | ७१.६३ | +१९.४६ |

तक्ता क्र.१


तक्ता क्रमांक १ नुसार असे लक्षात येते कि, गंगाखेड तालुक्यातील साक्षरता दर हे सन २००१ च्या जनगणनेनुसार ५१.८३% एवढा होता. या साली तालुक्यातील सर्वाधिक साक्षरता दर असणाऱ्या मुळी या गावाची साक्षरता ६२.४९% होती. त्या मागोमाग सिरसम शेगाव - ५७.३७, राणीसावरगाव – ५७.०१, मसला- ५६.५८ व रुमणा - ५४.४८, या गावांचा क्रमांक लागतो. तर सर्वात कमी साक्षरता दर दामपुरी या गावाचा ४३.४९% एवढा होता. तर सन २०११ च्या जनगणनेनुसार यात बऱ्याच अंशी वाढ झाल्याचे दिसून आलेली आहे , या वर्षी सर्वाधिक साक्षरता शेलमोहा या गावाची ७८.८७% इतकी होती. त्या नंतर वाघलगाव - ७४.९१, राणीसावरगाव- ७४.१५, रुमणा - ७४.३४, गौंडगाव- ७२.९४, मरडसगाव- ७२.१८ % साक्षरता दर असणारी गावे आहेत. तर सर्वात कमी साक्षरता गुंजेगाव – ६५.३३% या गावाची आहे.

| सोनपेठ तालुका साक्षरता दरातील वाढ (२००१ – ११) | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | गावाचे नाव | एकूण साक्षरता दर २००१ | एकूण साक्षरता दर २०११ | साक्षरता दरातील वाढ / फरक |
| १. | भिसेगाव | ५२.१४ | ६८.२ | +१६.०६ |
| २. | देवीनगर तांडा | ४७.६० | ६७.४५ | +१९.८५ |
| ३. | धार डीगोळ | ५०.६६ | ७२.२९ | +२१.६३ |
| ४. | डीगोळ इस्लामपूर | ५२.२३ | ७०.४४ | +१८.२१ |
| ५. | कान्हेगाव | ५१.९९ | ६६.८६ | +१४.८७ |
| ६. | खापट पिंपरी | ४८.४४ | ६९.२५ | +२०.८१ |
| ७. | लासिना | ५४.७६ | ७३.९३ | +१९.१७ |
| ८. | लोहीग्राम तांडा | ४३.७९ | ७४.६१ | +३०.८२ |
| ९. | नैकोटा | ५२.४० | ६७.१३ | +१४.७३ |
| १०. | नरवाडी | ५९.६७ | ७३.६ | +१३.९३ |
| ११. | निळा | ४६.१४ | ६८.३६ | +२२.२२ |
| १२. | पारध वाडी | ५९.५९ | ६४.७७ | +५.१८ |
| १३. | शेळगाव हाटकर | ५२.४८ | ६७.०५ | +१४.५७ |
| १४. | शेळगाव मराठा | ५३.१८ | ६२.५ | +९.३२ |
| १५. | सिरोरी | ४९.६४ | ६२.३३ | +१२.६९ |
| १६. | तीवठना | ४९.०६ | ६७.६५ | +१८.५९ |
| १७. | उक्कड गाव | ५०.४१ | ७३.०९ | +२२.६८ |
| १८. | विठा खु. | ५२.४४ | ७१.५ | +१९.०६ |
| १९. | वडगाव | ५३.७५ | ६१.४९ | +७.७३ |
| २०. | वाडी पिंपळगाव | ५५.१६ | ७३. | +१७.८४ |

तक्ता क्र. २

सोनपेठ तालुक्याची सरासरी साक्षरता २०११ साली ५१.७७% होती, ती वाढून २०११ साली ६८.७७% झाली. या दहा वर्षाच्या काळामध्ये तालुक्यातील साक्षरता दरात १७% वाढ झालेली आहे. यामध्ये सर्वाधिक साक्षरता ही तालुक्यातील लोहिग्राम तांडा या गावाची ७४.६१% आहे. त्या खालो-खाल लासीना ७३.९३% , उक्कडगाव ७३%०९., नरवाडी ७३%०६., वाडी पिंपळगाव ७३%, धारडीगोळ ७२.२९% एवढा साक्षरता दर होता, तर सर्वात कमी साक्षरता दर हे वडगाव या गावाचे ६१.४९% एवढे  पहावयास मिळते. एकंदरीत तालुक्यातील साक्षारतेत धनात्मक बदल पहावयास मिळाले आहे.

## ➢ गंगाखेड तालुक्याच्या  साक्षरता दरातील वाढ :-





आलेख क्र.१

गंगाखेड तालुक्यात साक्षरता दराच्या वाढीस खऱ्या अर्थाने २००१ नंतर सुरुवात झालेली पहावयास मिळते. २००१ ते २०११ या दहा वर्षाच्या काळात तालुक्याच्या साक्षरता दरामध्ये १७.६८% एवढी वाढ झाल्याचे दिसून येते. अभ्यासासाठी निवडलेल्या २० गावाचा विचार केला असता, सर्वाधिक साक्षरता दरातील वाढ ही दामपुरी या गावाची झालेली पहावयास मिळते. या गावाची साक्षरता २००१ साली ४३.४९% होती. ती वाढून २०११ साली ७०.९३% झाली. अर्थात या मध्ये तब्बल २७.४४ टक्क्यांनी  वाढ झालेली पाहावयास मिळते. या खालो-खाल शेलमोहा २४.२९%, इरळद २२.०९%, वाघलगाव २१.०७%, रुमना २०.२८%, बनपिंपळा १९.५६% व  झोला १९.४६% याप्रमाणे वाढ झालेली पाहावयास मिळते. तर सर्वात कमी साक्षरता दरातील वाढ ही घटांग्रा या गावाची पहावयास मिळते. या गावाची साक्षरता दरातील वाढ ५.७१% एवढी कमी झालेली आहे. जी की, दुसऱ्या गावाच्या तुलनेत नगण्य आहे.

### ➢ सोनपेठ तालुक्याच्या साक्षरता दरातील वाढ :-

सोनपेठ तालुक्याचा सरासरी साक्षरता दर २००१ साली ५१ तो .होता % ७७. वाढून २०११ साली ६८७७.% झाला. अर्थात यामध्ये १७% वाढ झालेली आहे. सोनपेठ तालुक्यातील साक्षरता दराच्या वाढीचा अभ्यास केला असता ,लोहीग्राम तांडा या गावाचा साक्षरता २००१ साली ४३%७९. होता. त्यामध्ये अत्यंत उभारी येऊन ७४ ६१.% पर्यंत पोहोचला आहे. या गावाचा साक्षरतादर हा ३०८२. टक्क्यांनी वाढलेला आहे. ही वाढ तालुक्यातील सर्वाधिक वाढ आहे. या गावाची एकूण साक्षरता सुद्धा तालुक्यातील इतर गावांपेक्षा सर्वाधिक आहे. त्यानंतर उक्कडगाव या गावाची साक्षरता दरातील वाढ ही २२६८.% झालेली आहे. त्या मागोमाग निळा २२२२.%, धारडीगोळ २१६३.%, खापट पिंपरी २०८१.% , देवी नगर तांडा १९८५.% व लासीना १९१७.% या गावांचा क्रमांक लागतो . तर सर्वात कमी साक्षरता दरातील वाढ ही पारध वाडी या गावाची ६९५९.% होती, ती वाढून ६४७७.% झाली. यामध्ये केवळ ०५१८.% वाढ झालेली आहे. त्यामागे वडगाव या गावाची साक्षरता ५३%७५. होती, ती वाढून ६१%४९. झाली यामध्ये केवळ ०७७३.% वाढ झालेली पाहावयास मिळते.




आलेख क्र.२


सोनपेठ तालुक्याचा सरासरी साक्षरता दर २००१ साली ५१ तो .होता % ७७. वाढून २०११ साली ६८७७.% झाला. अर्थात यामध्ये १७% वाढ झालेली आहे. सोनपेठ तालुक्यातील साक्षरता दराच्या वाढीचा अभ्यास केला असता, लोहीग्राम तांडा या गावाचा साक्षरता २००१ साली ४३%७९. होता. त्यामध्ये अत्यंत उभारी येऊन ७४ ६१.% पर्यंत पोहोचला आहे. या गावाचा साक्षरतादर हा ३०८२. टक्क्यांनी वाढलेला आहे. ही वाढ तालुक्यातील सर्वाधिक वाढ आहे. या गावाची एकूण साक्षरता सुद्धा तालुक्यातील इतर गावांपेक्षा सर्वाधिक आहे. त्यानंतर उक्कडगाव या गावाची साक्षरता दरातील वाढ ही २२६८.% झालेली आहे. त्या मागोमाग निळा

२२२२.%, धारडीगोळ २१६३.%, खापट पिंपरी २०८१.%, देवी नगर तांडा १९८५.% व लासीना १९१७.% या गावांचा क्रमांक लागतो. तर सर्वात कमी साक्षरता दरातील वाढ ही पारध वाडी या गावाची ६९५९.% होती, ती वाढून ६४७७.% झाली. यामध्ये केवळ ०५१८.% वाढ झालेली आहे. त्यामागे वडगाव या गावाची साक्षरता ५३%७५. होती, ती वाढून ६१%४९. झाली यामध्ये केवळ ०७७३.% वाढ झालेली पाहावयास मिळते.

## ➢ तुलनात्मक अभ्यास :-

दोन्ही तालुक्यातील साक्षरता दराचा अभ्यास कारताना तालुक्याचा ग्रामीण व शहरी भागानुसार अभ्यास करणे गरजेचा आहे. गंगाखेड तालुक्यातील ग्रामीण साक्षरता ७०.७६ % आहे. तर सोनपेठ तालुक्यातील साक्षरता दर ६८.६१% आहे. त्यामानाने गंगाखेड तालुक्याची ग्रामीण साक्षरता सोनपेठ तालुक्याच्या ग्रामीण साक्षरतेपेक्षा अधिक आहे. तर शहरी साक्षरतेचा विचार केला असता, गंगाखेड तालुक्याची साक्षरता ७६.४६ % आहे. तर सोनपेठ तालुक्याची शहरी साक्षरता ७१.८६% आहे. एकंदरीत गंगाखेड तालुक्याची साक्षरता हि सोनपेठ तालुक्यापेक्षा अधिक असल्याचे दिसून येते. गंगाखेड तालुक्यातील रस्ते व वाहतूक सुविधा या फरकावर परिणाम केल्याचे दिसून येते, कारण सोनपेठ तालुक्यात रस्त्याची अवस्था पहिले असता अत्यंत दुर्भिक्ष असल्याचे दिसून येते, या भागातील भौगोलिक परिस्तिथी रस्ते निर्मिती साठी मर्यादा ठरली आहे. कारण या भात ३० ते ४० फुटा पर्यंत काळी माती सापडते. यामुळे जमिनीत अस्थिरता राहते व त्यामुळे रस्त्याची निर्मिती हे आव्हान ठरले होते. याचा परिणाम विध्यार्थ्यांच्या आवागमनावर होत होता. परिणामतः त्या भागात साक्षरता कमी पहावयास मिळते. परंतु आज यात सुधारणा होत असून, त्याचा परिणाम साक्षरतेच्या वाढीवर होताना दिसून येत आहे. गंगाखेड तालुक्यात वाहतूक सुविधा मुबलक प्रमाणात आहेत त्यामुळे तालुक्यात विद्यार्थ्यांची असुविधा होत नाही. व याचा शिक्षणाचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणावर होण्यास मदत झाली आहे.

**आलेख क्र. १**




## ➢ निष्कर्ष :-

- गंगाखेड तालुक्याची सर्वसाधारण साक्षरता दर ७३.६१ % आहे, जे राज्याच्या साक्षरता दरापेक्षा कमी आहे.
- तालुक्यात सर्वाधिक साक्षरता दर सेलमोहा या गावाचा (७८.८७ %) आहे. तर सर्वात कमी साक्षरता दर गुंजेगाव या गावाचा आहे.
- सन २००१-११ या दहा वर्षाच्या काळात घटांग्रा गावाचा साक्षरता दर केवळ ५.७% वाढला आहे.
- गंगाखेड तालुक्याची ग्रामीण साक्षरता ७०.७६ % आहे, तर शहरी साक्षरता ७६.४६% आहे.

- सोनपेठ तालुक्याची सरासरी साक्षरता दर ७०.२४ % आहे.
- तालुक्यातील सर्वाधिक साक्षरता दर असणारा लोहीग्राम तांडा (७४.६१%) हे गाव आहे. तर सर्वात कमी साक्षरता दर वडगाव या गावाचा आहे. या गावाचा साक्षरता दर २००१ – ११ या काळात केवळ ७.७३ % वाढ झाली आहे. तर पारध वाडी या गावाचा दरात त्यापेक्षाही कमी (५.१८ %) वाढ झाली आहे.
- एकंदरीत गंगाखेड तालुक्याचा साक्षरता दर ग्रामीण व शहरी दोन्ही ठिकाणी सोनपेठ तालुक्यापेक्षा अधिक असल्याचे दिसून येते.

## ➢ संदर्भ साहित्य :-


- भारतीय जनगणना अहवाल २००१, २०११
- परभणी जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - २०११
- A comprehensive analysis of the journey of literacy – Dharmendra kumar.
- A comparative study of Punjab  and Gujarat. – Dr. Tina Singh.